ePaper

वर्ष - 6 । अंक - 354

# महाईन्यूज ™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

www.mahaenews.com । शुक्रवार, दि. 14एप्रिल 2023 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

## राज्यात लवकरच पंचतारांकित बस टर्मिनस : नितीन गडकरी





### निवडणूक आयोगच्या इमारतीसाठी

# प्रशासनाकडून वृक्षांची कत्तल!

## पर्यावरण प्रेमींमध्ये नाराजी : वृक्षांच्या जतनासाठी घेतला

**। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।**

**निवडणूक आयोगाच्या इमारतीसाठी सुमारे १५५ विविध दुर्मिळ देशी व औषधी पर्यावरणपूरक झाडांचा बळी जाणार आहे. त्यामुळे रावेतमधील वैभव समजल्या जाणाऱ्या 'मेट्रो इको पार्क' वाचविण्यासाठी पर्यावरण प्रेमी संघटना सरसावल्या आहेत. निवडणूक आयोगाच्या इमारतीसाठी दिलेल्या जागेतील इको पार्क मधील दीड ते दोन एकर जागेतील ही झाडे आहेत. सध्या या ठिकाणी पक्ष्यांचा किलबिलाट व विविध प्रजातींचा आधिवास वाढला असून पाण्याच्या पातळीत देखील वाढ झाली आहे.**

गेल्या दोन महिन्यांपासून या ठिकाणी निवडणूक विभागाने मेट्रो पार्कच्या जागेत इमारतीसाठी खोदकाम सुरू केले असून, शहरातील पर्यावरणप्रेमी संघटनांनी या कामास कडाडून विरोध केला आहे.

अभिनेते सयाजी शिंदे यांनीही झाडे वाचविण्यासाठी या पार्कला भेट दिली आहे. २०१६ मध्ये प्राधिकरण सेक्टर २९ मध्ये मेट्रो पार्क विकसित झाले आहे. पिंपरी-चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाने मेट्रो पार्कच्या विकासाला मान्यता दिली. सध्याची जागा ही ५ एकर आहे.

पुणे मेट्रोच्या मार्गातील झाडे तोडून न टाकता या झाडांचे या ठिकाणी पुर्नरोपण करण्यात आले आहे. या भागात असणाऱ्या झाडांना एक प्रकारे जीवदान



मिळाले आहे. त्या परिसरातील नागरिकांनीही या पार्कमध्ये दुर्मिळ व औषधी झाडे लावली आणि त्यांचे संगोपनही केले. सध्या रावेतमध्ये मोकळा श्वास घेण्यासाठी व शुद्ध ऑक्सिजनपोटी एकही उद्यान नाही. सध्या नागरिक फेरफटका मारण्यासाठी या ठिकाणी आले असता प्रत्येकजण झाडांसाठी पाणी हातात घेऊन येतात आणि व त्या ठिकाणी स्वच्छता करुन माघारी फिरतात. हा बऱ्याच जणांचा नित्यक्रम झालेला आहे. या ठिकाणी होत असलेल्या चोऱ्यांना रहिवाशांनी आळा घातला आहे. या ठिकाणी कुंपण करुन पाणी समस्या सोडविण्यातही नागरिकांचा सिंहाचा वाटा आहे.

> **जिल्हाधिकाऱ्यांची या ठिकाणी भेट लांबल्याने मेट्रो पार्कमधील झाडे वाचविण्यासाठी नागरिक सैरभैर झाले आहेत. मेट्रो पार्कमध्ये हस्तक्षेप न करता झाडे वाचविण्यासाठी एफएसआय वाढवून द्यावा. अनेक वर्षे या झाडांची आम्ही सेवा केली आहे. यापुढेही ही झाडे जपण्यासाठी आम्ही तत्पर आहोत.**
>
> **- शंतनू खंडाळकर, नागरिक, रावेत.**

> **आम्ही २०१७ मध्ये देशी आणि काही दुर्मिळ झाडे सह्याद्रीमधून आणली आहेत. विविध प्रजाती या ठिकाणी आहेत. झाडे १८ ते २० फुटांची झाली आहेत. या भागातील नागरिकांनी या झाडांना पाणी देवून जगविले आहे. सुमारे १५० प्रजाती या ठिकाणी आहेत.**
>
> **- विकास बदोलिया, नागरिक, रावेत.**


> **आतापर्यंत मेट्रोपार्कच्या झाडे तोडण्याचा विषय आमच्यापर्यंत आला नाही. आम्ही वृक्ष प्राधिकरणाच्या बैठकीनंतर निर्णय घेवू. तोपर्यंत कोणीही झाडे तोडू शकत नाही.**
>
> **- गोरख गोसावी, मुख्य उद्यान अधीक्षक, उद्यान विभाग, महापालिका.**

# माझ्यामुळे कुणाला धोका वाटतो का? : अजित पवार

## भाजपाच्या पदाधिकाऱ्याची तक्रार : आदेश नसताना प्लॉटच्या मोजणीचे पत्र

**। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।**

राष्ट्रवादीचे नेते आणि विधानसभेचे विरोधी पक्षनेते अजित पवार यांच्यापासून आपल्या जीवाला धोका असल्याचं सांगत पुण्यातील एका भाजप पदाधिकाऱ्याने पोलीस ठाण्यात तक्रार दिली आहे. शहरातील शिवाजीनगर, गणेश खिंड परिसरातील मोकळ्या प्लॉटसंदर्भात मोजणी न करण्याचे न्यायालयाचे आदेश असतानाही सदर प्लॉटची मोजणी



करण्याचे एक पत्र अजित पवार यांच्या नावाने आलं असल्याने या प्रकरणात माझ्या जीविताला धोका निर्माण झाल्याचा दावा करत शिवाजीनगर मतदारसंघातील भाजप अध्यक्ष रवींद्र साळगावकर यांनी खडक पोलीस ठाण्यात तक्रार दिली आहे.

या प्रकरणाची अधिक माहिती अशी की, शिवाजीनगरमधील एका प्लॉटवर साळगावकर यांचा ताबा आहे. १९९९ पासून ते सदर ठिकाणी भाडेतत्त्वावर राहत. मात्र दोन महिन्यांपूर्वी काही अधिकारी त्या जागेची मोजणी करण्यासाठी आले होते. तसंच आधीही या जागेची मोजणी करण्यात आली होती.

याची अधिक माहिती घेतल्यानंतर अजित पवार यांच्या आदेशाने ही मोजणी होत असल्याचं मला कळाल्याचं रवींद्र साळगावकर यांनी म्हटलं आहे.

# राज्यातील बोगस शाळा होणार बंद!

## अनधिकृत शाळांवर आता कारवाईचा बडगा उगारून त्या बंद करण्याचे आदेश

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**गेल्या काही महिन्यांपासून राज्यात अनधिकृत शाळा, बोगस शाळा सुरू असल्याचे प्रकार उघडकीस आले आहेत. त्यातील अनधिकृत शाळांवर आता कारवाईचा बडगा उगारून त्या बंद करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. शिक्षण आयुक्त सूरज मांढरे यांनी या संदर्भात विभागीय शिक्षण उपसंचालकांना परिपत्रकाद्वारे स्पष्ट निर्देश दिले आहेत.**

राज्यातील शाळांना शासनाकडून देण्यात आलेले परवानगी प्रमाणपत्र, परवानगी आदेश, स्वमान्यता प्रमाणपत्र, इ. संबंधित दस्तऐवजांची वैधता तपासण्यासाठी सहसंचालक, प्रशासन, अंदाज आणि नियोजन, आयुक्त शिक्षण कार्यालय यांचे अध्यक्षतेखाली गठीत करण्यात आलेल्या समितीमार्फत वेळोवेळी निर्देश, सूचना देण्यात आलेल्या आहेत. या समितीमार्फत देण्यात आलेल्या सूचनांनुसार आपल्या विभागातील शाळांच्या वैधता प्रमाणपत्रांची तपासणी पूर्ण करून अंतिम अहवाल या कार्यालयास २८ एप्रिलला सायंकाळी पाच वाजेपर्यंत सादर करावा, असे स्पष्ट नमूद करण्यात आले आहे.

तसेच या प्रकरणी कार्यवाही करण्यासाठी मुदतवाढ दिली जाणार नाही याची नोंद घ्यावी. आपल्या कार्यक्षेत्रातील राज्यमंडळाच्या व्यतिरिक्त अन्य मंडळांच्या शाळांकडे ना हरकत प्रमाणपत्र, संलग्नता प्रमाणपत्र आदी कागदपत्रे नसल्यास अशा शाळांवर आरटीई २००९ च्या अनुषंगिक शासन निर्णयाप्रमाणे कार्यवाही करावी.

तसेच अनधिकृतपणे चालवल्या जाणाऱ्या शाळांवर शासनाच्या प्रचलित नियमाप्रमाणे आवश्यकतेप्रमाणे दंड आकारणे, पोलिसांकडे एफआयआर दाखल करणे, शाळा बंद करणे, आदी कारवाई २५ एप्रिलपूर्वी करायची आहे. सदर शाळांवरील कारवाईमुळे विद्यार्थ्यांचे नुकसान होणार नाही याची दक्षता घेत विद्यार्थ्यांचे समायोजन जवळच्या शाळेत करण्यात यावे. कोणत्याही परिस्थितीत सदर प्रकरणी दिरंगाई होणार नाही याची दक्षता घ्यावी, असेही स्पष्ट करण्यात आले आहे.

### समाविष्ट गावांतील टाउनशिपना आदेश लागू

**» राज्यातील शाळांना शासनाकडून देण्यात आलेले परवानगी प्रमाणपत्र, परवानगी आदेश, स्वमान्यता प्रमाणपत्र, इ. संबंधित दस्तऐवजांची वैधता तपासण्यासाठी सहसंचालक, प्रशासन, अंदाज आणि नियोजन, आयुक्त शिक्षण कार्यालय यांचे अध्यक्षतेखाली गठीत करण्यात आलेल्या समितीमार्फत वेळोवेळी निर्देश, सूचना देण्यात आलेल्या आहेत. या समितीमार्फत देण्यात आलेल्या सूचनांनुसार आपल्या विभागातील शाळांच्या वैधता प्रमाणपत्रांची तपासणी पूर्ण करून अंतिम अहवाल या कार्यालयास २८ एप्रिलला सायंकाळी पाच वाजेपर्यंत सादर करावा, असे स्पष्ट नमूद करण्यात आले आहे.**





# वीज वाहिनीवर झाड पडले ; नागरिकांचे हाल...

। कोथरूड । महाईन्यूज । प्रतिनिधी।

धन्वंतरी सोसायटी, साईबाबा मंदिर, एमआयटी रोड येथे विजेच्या उच्चदाब वाहीनीवर झाड कोसळल्याने वीज प्रवाह खंडित झाला. रात्री उशिरापर्यंत वीज येणार नाही असे वीज मंडळाच्या कामगारांनी सांगितले.

दिलीप कानडे म्हणाले की, सायंकाळी सहा पासून अनेक भागातील वीज गेली आहे. अग्निशमन दलावर ताण आलेला आहे. मनपाची आपत्कालीन व्यवस्था काम करते की नाही हे समजायला मार्ग नाही.

कोथरूड क्षेत्रीय कार्यालयाचे सहाय्यक आयुक्त केदार वझे म्हणाले की, झाड पडीच्या 27 तक्रारी आल्या आहेत. कोथरूड डेपो येथे पावसाचे पाणी साचल्याने वाहतुक कोंडी झाली होती. आपत्कालीन व्यवस्थापन विभागाच्या गटाने पाणी जाण्यासाठी वाट करून दिली. जयभवानीनगर येथील रहीवाशी हरीभाऊ सणस म्हणाले की, मेट्रोसाठी अत्याधुनिक तंत्रज्ञान वापरल्याचे सांगतात. यामध्ये पावसाचे पाणी व्यवस्थित वाहून जाण्याचे साधे तंत्रज्ञान वापरलेले नाही का? आज कमी पाऊस असताना असे होत असेल तर मोठ्या पावसात पुण्याचे मुंबई प्रमाणे तुंबई व्हायला वेळ लागणार नाही.



# देशभरातील मुस्लीम महिलांना मशिदीत नमाज पठण करू द्या!

## पुण्यातील दाम्पत्याची सर्वोच्च न्यायालयात धाव घेत केली मागणी

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**मुस्लीम महिलांना मशिदीत जाऊन नमाज पठण करता यावे, यासाठी पुण्यातील एका दाम्पत्याने गेल्या वर्षी रमजान महिन्यात लढा सुरू करून त्यासाठी सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली.**

या लढ्याची दखल घेत मुस्लीम पर्सनल लॉ बोर्डाला मशिदींमध्ये महिलांना नमाज पठणाचा अधिकार असल्याचे मान्य करावे लागले. यामुळे गेल्या वर्षीच्या रमजान महिन्यात जिथे महिलांना मज्जाव होता त्याच मशिदीत यंदा मुस्लीम महिला नमाज पठण करताना दिसत आहेत. याच धर्तीवर देशभरातील सगळ्या महिलांना मशिदीत जाऊन नमाज पठण करू द्यावे, अशी मागणी एका दाम्पत्याने केली आहे. गेल्या वर्षी रमजानच्या खरेदीसाठी शेख दाम्पत्य लष्कर भागामध्ये गेले होते. मात्र, नमाज अदा करण्याची वेळ जवळ आल्यावर अन्वर शेख यांना मशिदीत प्रवेश देण्यात आला. फरहान यांना बाहेर पावसात भिजत उभे राहावे लागले. त्यानंतर या जोडप्याने ते वास्तव्यास असलेल्या बोपोडी येथील मशिदीच्या व्यवस्थापनाकडे महिलांना मशिदीत प्रवेश देण्याची मागणी केली. मात्र, त्याला नकार देण्यात आल्याने दाम्पत्याने सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल केली. या याचिकेसंदर्भात मुस्लीम पर्सनल लॉ बोर्डाला मुस्लीम महिलांना मशिदीत जाऊन नमाज पठण करण्याचा अधिकार असल्याचे मान्य केले होते.



# दिवसभर काहिली अन्‌ रात्री गारवा!

## शहरात अवकाळी पावसाची हजेरी : 40 डिग्रीपेक्षा जास्तीच्या तापमानाची नोंद

।पिंपरी ।
। महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पिंपरी-चिंचवड शहरातील तापमानाने बुधवारी (दि.१२) रोजी यंदाच्या उन्हाळ्यातील तापमानाचा उच्चांक गाठला. बुधवारी शहरात ४१ अंश कमाल तापमानाची नोंद झाली. गेल्यावर्षी २८ एप्रिल रोजी ४३ अंश उच्चांकी तापमानाची नोंद झाली होती. हळूहळू तापमानाचा पारा वाढताना दिसत आहे. मात्र, सायंकाळी ढग भरुन आले. शहरातील बहुतांश ठिकाणी अवकाळी पावसाने जोरदार हजेरी लावली. ढगांचा गडगडाट आणि वीजेच्या कडकडाटासह पावसाने पिंपरी-चिंचवडकरांना गारवा दिला.**

दिवसेंदिवस जाणवणाऱ्या तीव्र उकाड्यामुळे नागरिक हैराण झाले आहेत. पिंपरी चिंचवड शहरात – गेल्या काही दिवसांपासून ३८ ते ३९ अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली. त्यामुळे दिवसेंदिवस होणाऱ्या उकाड्यात घट होण्याऐवजी वाढ होत असल्याने नागरिकांना उकाड्यातून काही दिलासा मिळत नाही, अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. बुधवारी तापमानाने उच्चांक गाठला असून पिंपरी- चिंचवडमध्ये ४१ अंश तापमानाची नोंद झाली आहे.

**सायंकाळी अवकाळी तडाखा...**

सायंकाळी साडेसहा वाजण्याच्या सुमारास आकाश भरून आले आणि ढगांच्या कडकडाटासह पावसाने हजेरी लावली. त्यामुळे पुणेकरांची चांगली तारांबळ उडाली. पुढील पाच दिवस अजून दुपारी आकाश निरभ्र असेल आणि सायंकाळनंतर हलक्या ते मध्यम स्वरूपाच्या सरी कोसळतील, असा अंदाज हवामान खात्याने वर्तविला होता. त्यानुसार आज पावसाने हजेरी लावली. आज सकाळपासूनच ढगाळ वातावरण होते. तसेच पावसाची चिन्हेही दिसू





**नागरिक घामाघुम, थंडाव्याचा प्रयत्न...**

**तापमानात होणाऱ्या वाढीने अंगाची काहीली आणि बेचैनी निर्माण होत आहे. उन्हात फिरणाऱ्या नागरिकांना डोकेदुखी, चक्कर, मळमळ आणि उलटीचे त्रास जाणवत आहेत. उन्हापासून संरक्षण म्हणून टोपी, छत्री, गॉगल घेतले तरी उन्हात फिरताना उन्हाचे चटके जाणवत आहेत. त्यामुळे उन्हात रस्त्यावर गर्दी कमी होऊ लागली आहे. वाढलेल्या तापमानाच्या पायामुळे फॅनची हवादेखील गरम जाणवत आहे. दिवस अन रात्रीही घामाघूम झालेले नागरिक थंडावा मिळविण्याचा प्रयत्न करत आहेत.**

---

# सोसायटीधारकांचे प्रश्न सोडवण्याचा संकल्प!

## आमदार अश्विनी जगताप यांचा वाकड दौरा : प्रत्यक्ष जागेवर जाऊन केली पाहणी

।पिंपरी-चिंचवड।
। महाईन्यूज । प्रतिनिधी।

**आमदार अश्विनी लक्ष्मण जगताप यांनी प्रभाग क्रमांक २५, वाकडमधील गृहनिर्माण सोसायटांच्या प्रश्नांसंदर्भात महापालिकेचे अधिकारी आणि सोसायट्यांमधील नागरिकांना सोबत घेऊन जागेवर जाऊन पाहणी केली. या गृहनिर्माण सोसायट्यांना येणाऱ्या अडचणी आणि समस्या तातडीने सोडवण्याच्या सूचना त्यांनी अधिकाऱ्यांना केली. वाकडमधील सोसायट्यांच्या समस्या व प्रलंबित प्रश्न सोडवण्यासाठी आमदार अश्विनी लक्ष्मण जगताप यांनी घेतलेल्या या पुढाकारामुळे तेथील नागरिकांनी समाधान व्यक्त केले आहे.**

आमदार अश्विनी लक्ष्मण जगताप यांनी केलेल्या या पाहणी दौऱ्यावेळी भाजपचे चिंचवड विधआनसभा निवडणूक प्रभारी संतोष कलाटे, रणजीत कलाटे, स्नेहा कलाटे, माजी नगरसेवक विनायक गायकवाड, संदीप कस्पटे, भाजपचे उपाध्यक्ष राम वाकडकर, महापालिकेच्या पर्यावरण विभागाचे प्रमुख संजय कुलकर्णी, स्थापत्य विभागाचे कार्यकारी अभियंता श्रीयुत देसले तसचे जलनिस्सारण, स्थापत्य व इतर विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

आमदार अश्विनी लक्ष्मण जगताप यांनी अधिकाऱ्यांसमवेत वाकडमधील विविध सोसायट्यांमध्ये जाऊन विविध कामांचा पाहणी दौरा व समस्यांवर चर्चा केली. पनाश सोसायटी, शिवांजली सोसायटी, यश व्हीसटेरीया व गणेश इम्पेरिया सोसायटीमध्ये जाऊन अधिकाऱ्यांसमवेत चालू असलेल्या सिमेंट काँक्रीट रस्त्यांची पाहणी केली. चालू कामांबाबत नागरिकांना येत असलेल्या अडचणी समजून घेत तत्काळ अधिकाऱ्यांना कामात सुधारणा करण्याच्या सूचना त्यांनी केल्या. यावेळी नागरिकांनी नाल्यामुळे उद्भवणाऱ्या समस्या सांगितल्या.



**प्रशासनाला केल्या सूचना...**

**आमदार जगताप यांनी नाल्याची प्रत्यक्ष पाहणी करून नाल्यात सोडण्यात येणाऱ्या सांडपाणी तात्काळ बंद करण्याबाबत सूचना केली. नाल्यावर बांधण्यात आलेले लेबर कॅम्पचे शौचालय त्याचप्रमाणे बुजवलेला नाला मोकळा करण्यासही त्यांनी सांगितले. नाला गाव नकाशाप्रमाणे आहे का की त्याच्यावर कोणी अतिक्रमण केले आहे याची खात्री करण्यासही त्यांनी अधिकाऱ्यांना सांगितले. सांडपाण्यामुळे नागरिकांना होणाऱ्या त्रासावर कायमस्वरूपी तोडगा काढण्याच्या दृष्टीने संबंधित विभागास त्यांनी निर्देश दिले.**

## संपादकीय »

# एका प्रकल्पाची कथा नि व्यथा

***पायाभूत सुविधांचा विकासाचा प्रकल्प मार्गी लावताना किती गोष्टींचा विचार करावा लागतो, याची झलक मुंबईच्या "कोस्टल रोड" प्रकल्पाच्या निमित्ताने पाहायला मिळाली. वरळीच्या किनारपट्टीला आणि वरळी कोळीवाड्याला अनेक शतकांचा इतिहास आहे.***

वरळी कोळीवाडा सोडून आपल्याला वरळीमध्ये किंवा वरळी मार्गे होणाऱ्या कोणत्याही पायाभूत सुविधांचा विकासाचा विचार होणे कठीण आहे. मुंबईच्या "कोस्टल रोड" प्रकल्पाला खीळ या वरळीतच गेली पाच वर्षे लागलेली होती, ती देखील मुंबईच्या किनाऱ्यालगत होणाऱ्या मासेमारीमध्ये अडथळा येत असल्यामुळे. वरळी जवळून कोस्टल रोड सी लिंकला जोडला जात आहे. तेथील क्लीव्ह लॉण्ड बंदराजवळ दोन्ही रस्त्यांना जोडणाऱ्या कनेक्टरचे काम सुरू होते. त्या पिलरमध्ये प्रस्तावित अंतर ६० मीटर होते.

ज्यामुळे कोळ्यांच्या बोटांना ये जा करण्यासाठी अडथळा निर्माण होणार होता. हे अंतर वाढवण्याची मागणी मच्छिमार व्यावसायिकांनी केली होती. अखेरीस यासाठी नियुक्त केलेल्या समितीने दिलेल्या अहवालानुसार १२० मीटर अंतर करण्यावर शिक्कामोर्तब करण्यात आल्याची घोषणा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी नुकतीच केली. मच्छिमारांची मागणी किमान १६० ते २०० मीटर अंतर वाढविण्याची होती, मात्र त्यांनीही १२० मीटर अंतरावर समाधान व्यक्त केल्याने कोस्टल रोडचे वरळीत थांबलेले काम सुरू होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

महापालिकेने या प्रश्नासाठी समिती नेमली होती. अभ्यासाअंती या समितीतील तज्ज्ञांनी दोन खांबांमधील अंतर १६० मीटर करण्याची शिफारस महापालिकेला केली होती. गेल्या दोन वर्षांपासून सुरु असलेल्या चर्चा, बैठकांनंतर अखेर वरळी इथल्या समुद्रामधील सात ते नऊ या तीन खांबांमधील क्रमांक आठ हा खांब रद्द करुन दोन खांबांमधील अंतर १२० मीटर ठेवण्याचा निर्णय महापालिकेने घेतला. त्यावर मच्छिमार संघटना आणि पालिका यांच्यात एकमत झाले आहे. मुख्यमंत्र्यांच्या अखत्यारीत असलेल्या नगरविकास विभागाने हिरवा कंदील दाखवला आहे. मुंबईसारख्या शहरातही स्थानिकांचा (कोळी समाज) पारंपरिक रोजगार हा मासेमारीचा आहे. त्यामुळे केवळ साठसत्तर बोटी मासेमारीसाठी वरळीहून जातात.



## आनंदी सकाळ

# परमेश्वर आनंदरूप, चिरंतन आहे

परमार्थाचा विषय तसा खरोखरच कठीण आहे आणि सर्वांना नडणारा आहे. ज्याला हा विषय जाणून घ्यायचा असेल त्याला, मी कोण हे जाणण्यापेक्षा, मी कोण नव्हे हे जाणणे महत्त्वाचे आहे. एखाद्या पाऊलवाटेने जात असताना ती वाट चुकलो आणि आपण भलत्या मार्गाला लागलो तर त्यापुढला सर्व व्यवहार चुकत जाणार. एखादे गणित सोडविताना एखाद्या आकड्याची चूक झाली की त्यापुढले सर्व गणित चुकत जाते किंवा एखाद्या रोगाचे निदान बरोबर झाले नाही तर मग त्या रोगावर केलेली औषधयोजना फुकट जाते, त्याप्रमाणे मनुष्याच्या सर्वसामान्य गुणधर्मांचे आकलन जर बरोबर झाले नाही, तर या गुणधर्मावर आधारलेला परमार्थाचा मार्गही जाणणे फार कठीण गोष्ट होईल. आपण आनंदी असावे, नेहमी आनंदात रहावे, असे सर्वांनाच वाटते; हा झाला पहिला गुणधर्म. या आनंदात चिरंतन असावे, निदान आनंदाच्या अपेक्षेत तरी चिरंतन रहावे, असेही आपल्याला वाटते.

# आयुष्य बदलवणारा एक क्षण






आता काहीच दिवस उरलेत नवीन वर्ष सुरू होईल. अनेक लोक संकल्प करतील आणि खूप कमी लोक ते पूर्ण करतील. संकल्प करण्यासाठी काही जास्त लागत नाही, पण पूर्ण करण्यासाठी 'सातत्य' हे ठेवावे लागते आणि स्वत:सोबत प्रामाणिकसुद्धा राहावं लागतं. नवीन वर्ष येतंय म्हणूनच तुम्ही संकल्प केला पाहिजे असं अजिबात नाही. प्रत्येक दिवस वेगळा आहे. प्रत्येक दिवशी संधीसुद्धा नवीन असतात. काहींना प्रत्येक सकाळ, प्रत्येक क्षण सारखा वाटू शकतो, पण ते सत्य नाही. म्हणून आपल्या प्रत्येक क्षणावर एक वेगळा व नाविन्यपूर्णतेने जगण्याचा प्रयोग करून पाहा. कोणता क्षण कधी, कोणत्या क्षणी निसटून जाईल हे आपल्याला ठाऊक नसते किंवा ही संधी कधी, किती वर्षांनी येईल हे माहीत नसते. एका दिवसानंतर येईल, काही वर्षांनंतर येईल, पण तुमचा दिवस येईल हे नक्की.

तुम्ही मागे जाऊन एक नवी सुरुवात करू शकत नाहीत. त्यामुळे आजपासूनच नवी सुरुवात करा. चांगल्या सुरुवातीची अखेरही चांगली होऊ शकते. वाटेल त्या परिस्थितीतून तुम्ही प्रारंभाची सुरुवात करू शकता. सहा वर्षांच्या अध्ययनानंतर गौतम बुद्धांनाही असाच अनुभव आला आणि चाळीसाव्या वर्षी पैगंबरांनी हीच अनुभूती घेतली. जॉर्ज बर्नार्ड शॉ यांनी तिसाव्या वर्षी, कर्नल सेंन्डर्स यांना वयाच्या पासष्टाव्या वर्षी आणि या सर्वांप्रमाणे इतर महान लोकांनाही असाच अनुभव आला.

अनेक महान विभूतींचे वैशिष्ठ्य म्हणजे त्यांनी स्वप्न त्यांच्या चांगल्या काळात पाहिले नसून वाईट परिस्थितीत पाहिले होते. धीरूभाई अंबानींनी डिजिटल इंडियाचे स्वप्न १९९९ साली पाहिले होते, मात्र तेव्हा भारतात संवाद किंवा संपर्क करणे खूप कठीण गोष्ट होती. मानवी गरजांमध्ये अन्न, वस्त्र व निवारा याव्यतिरिक्त माहिती आणि संपर्काची सर्व साधने असण्याचे ते स्वप्न आज साकार झाल्याचे आपण पाहत आहोत. रतन टाटांनीदेखील असेच एक स्वप्न पाहिले होते. मध्यमवर्गीयांना एक लाख रुपयांपर्यंत कार उपलब्ध करून देण्याचे आणि न्यानोच्या रूपात ते सत्यातही उतरवले. देश पारतंत्र्यात असताना महात्मा गांधींनी स्वातंत्र्याचे स्वप्न पाहिले होते. इतर प्रगत देशांच्या तुलनेत भारताची वर्ल्ड क्लास विमान बनवण्याची पात्रता नव्हती.

त्यावेळी मिसाईलमेन एपीजे अब्दुल कलामांनी असेच स्वप्न पाहिले होते आणि अंतराळ क्षेत्रातील आजचे भारताचे स्थान उल्लेखनीय आहे हे आपण सर्वच जाणतो. या सर्व गोष्टी सांगण्याचा मुद्दा हाच आहे की या नेत्यांनी प्रतिकूल परिस्थितीत स्वप्न पाहिले होते आणि पुढे त्यांच्याच स्वप्नाच्या जोरावर संघटना, देश आणि मानवता एकवटली गेली.

# पुरोगामी महाराष्ट्रात महिला कुलगुरूंची संख्या नगण्यच!

**अमरावती इथल्या संत गाडगेबाबा विद्यापीठाला येणाऱ्या २०२३ मध्ये ४० वर्षं पूर्ण होत आहेत. याशिवाय राज्यात चार स्वतंत्र कृषी विद्यापीठंदेखील कार्यरत आहेत. यापैकी राहुरी इथलं महात्मा फुले कृषी विद्यापीठ सर्वात जुनं.**

हे विद्यापीठ १९६८ मध्ये अस्तित्वात आलं. त्यानंतर १९६९ मध्ये डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ अकोला इथं सुरू झालं. दादासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठ, दापोली आणि वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी; ही दोन्ही विद्यापीठं एकाच वर्षी म्हणजे वर्ष १९७२ मध्ये स्थापन झाली. ही चारही विद्यापीठं कार्यान्वित होऊन अर्धशतकाचा काळ उलटलेला आहे.

नाशिकला यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ तर लोणेरे (रायगड ) इथं डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रज्ञान विद्यापीठ, ही दोन विद्यापीठं १९८९ मध्ये स्थापन झाली. जळगाव इथं कवयित्री बहिणाबाई उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ १९९० मध्ये सुरू करण्यात आलं. या तीनही विद्यापीठांची स्थापना होऊन तीन दशकं उलटली आहेत. औरंगाबादच्या मराठवाडा विद्यापीठाचा नामविस्तार झाल्यावर या विद्यापीठाचं विभाजन करून १९९४ मध्ये नांदेड इथं स्वामी रामानंद तीर्थ



मराठवाडा विद्यापीठाची स्थापना करण्यात आली. पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर विद्यापीठ, सोलापूर (२००४) आणि गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली २०११ मध्ये अस्तित्वात आली आहेत.

या सर्व विद्यापीठांच्या स्थापना वर्षावर नजर टाकली असता असं लक्षात येतं की, १५० वर्षं ते ११ वर्षं एवढं यांचं वयोमान आहे. ही विद्यापीठं स्थापन झाल्यापासून आजपर्यंत किती आणि कोणत्या विद्यापीठांमध्ये महिला कुलगुरूंची नियुक्ती झाली आहे याचा शोध घेतला तर प्रचंड निराशा हाती लागते. (सध्याच्या महाराष्ट्र विद्यापीठ कायद्यानुसार कुलगुरूपदाचा कार्यकाळ हा या पदावरील व्यक्तीने वयाची ६५ वर्षं पूर्ण होईपर्यंत किंवा अधिकतम पाच वर्षांचा असतो. एखाद्या कुलगुरूची निवड वयाच्या ६१ व्या वर्षी झाली तर ती व्यक्ती चार वर्षंच या पदावर राहू शकते.) एसएनडीटी महिला विद्यापीठाशिवाय इतर अनेक विद्यापीठांमध्ये एकदाही महिला कुलगुरूची निवड झालेली नाहीये. महर्षी कर्वे यांनी महिलांसाठी स्थापन केलेल्या एसएनडीटी विद्यापीठाच्या कायद्यात तरतूद केल्यानुसार इथं केवळ महिलेलाच कुलगुरू होण्याची संधी मिळते. (त्यामुळे इथं १९४२ ते २०२१ या कालखंडात १४ महिलांना कुलगुरूपदावर काम करण्याची संधी मिळाली आहे.) १५० वर्षं जुन्या मुंबई विद्यापीठात आतापर्यंत फक्त दोनदा महिला कुलगुरू झाल्या आहेत.

डॉ. मेहरू बेंगाली १९८६ ते १९९२ आणि डॉ. स्नेहलता देशमुख १९९५ ते २००० या कालावधीत इथं कुलगुरू होत्या. एके काळी पूर्वेचं ऑक्सफर्ड असा लौकिक असलेल्या सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाला आजतागायत एकदाही महिला कुलगुरू लाभल्या नाहीयेत, ही बाब विशेष नोंद घेण्याजोगी आहे.

## ।। अभंगवाणी ।।



अगा करुणाकरा करितसें धांवा ।
या मज सोडवा लवकरी ॥१॥
ऐकोनियां माझी करुणेचीं वचनें ।
व्हावें नारायणें उतावीळ ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827.
(विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# ज्यांना सगळं दिलं ते सोडून गेले !

## " आदित्य ठाकरेंचा एकनाथ शिंदेंना टोला



। मुंबई ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

**एकनाथ शिंदे यांचं बंड, उद्धव ठाकरे यांचं काय म्हणणं होतं? या सगळ्यावर आदित्य ठाकरे यांनी भाष्य केलं आहे. ज्यांना आम्ही सगळं काही दिलं ते निघून गेले. ज्यांना काहीच दिलं नाही ते सोबत राहिले. ज्यांना आम्ही कुटुंबातले मानायचो, परिवारातले मानायचो. इतका विश्वास टाकला तरीही ते लोक निघून गेले असं आदित्य ठाकरेंनी म्हटलं आहे. आदित्य ठाकरे मुंबई तकच्या बैठक कार्यक्रमात आले होते. त्यावेळी त्यांनी एकनाथ शिंदे आणि इतर विषयांवर भाष्य केलं.**

जे काही नऊ महिन्यांपूर्वी घडलं त्यानंतर आम्हाला विचार करायला वेळ मिळाला नाही. याबाबत एकटा असताना विचार करतो तेव्हा वाईट वाटतं. तेव्हाच आणखी एक गोष्ट मनात येते की या गोष्टीचं माझ्या वडिलांना म्हणजे उद्धव ठाकरेंना किती वाईट वाटलं असेल?कारण ज्या माणसाने तुम्हाला सगळं दिलं त्याच्या पाठीत तुम्ही खंजीर खुपसता. पक्ष सोडणं वेगळी गोष्ट आहे. अनेक लोक पक्ष सोडतात, पण यांनी पक्ष सोडला नुसता सोडला नाही तर पक्ष चोरला. नाव चोरणं, चिन्ह चोरणं, जे काही आम्ही त्यांच्यासाठी केलं ते विसरून आम्हाला शिव्याशाप देणं हे कितपत योग्य आहे?

माणुसकीवरचा विश्वास उडवणारी ही गोष्ट आहे. असंही आदित्य ठाकरेंनी म्हटलं आहे. दुसऱ्या बाजूने विचार केला तर ४० ची गँग सोडली तर अनेक लोकांनी आम्हाला प्रेम दिलं. मी देशभरात फिरलो अनेक लोक प्रेम करतात शेवटी तेच महत्त्वाचं आहे असंही आदित्य ठाकरेंनी म्हटलं आहे. प्रत्येक बैठकीत मी एकनाथ शिंदेंना आदर सन्मान देत होतो. मी विरोधी पक्षावर कधीही सत्तेत असताना टीका केली नाही. विरोधी पक्षात असो किंवा सत्ताधारी पक्षात असो मुद्देसुद बोललं पाहिजे. आत्ता बघा राजकारणात काय चाललंय? मुद्दे सोडून सगळे बोलत आहेत असंही आदित्य ठाकरेंनी म्हटलं आहे.

जी काही कारणं त्यांनी दिली आहेत बंड करण्याची ती वेगवेगळी आहेत. कधी म्हणतात उद्धव ठाकरे भेटत नव्हते, कधी म्हणतात निधी मिळत नव्हतात, कधी हिंदुत्वाचं कारण देतात. जे लोक बाहेर गेले आहेत ते स्वतःसाठी गेले आहेत कारणं शंभर देत आहेत कारण वास्तव नाही असंही आदित्य ठाकरे यांनी म्हटलं आहे.

## "उद्धव ठाकरे पुन्हा मुख्यमंत्री होणं अशक्य"

### » देवेंद्र फडणवीस यांचं भाकीत

। मुंबई ।।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

उद्धव ठाकरे पुन्हा मुख्यमंत्री होणं अशक्य आहे असं वक्तव्य उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केलं आहे. सर्वोच्च न्यायालयात महाराष्ट्राच्या सत्तासंघर्षाचा निकाल लागणं बाकी आहे. त्याबाबत त्यांना प्रश्न विचारला असता हे मोठं भाकीत देवेंद्र फडणवीस यांनी केलं आहे. देवेंद्र फडणवीस हे आज मुंबई तकच्या बैठक कार्यक्रमात आले होते. त्याच कार्यक्रमात त्यांनी हे भाष्य केलं आहे. देवेंद्र फडणवीस यांच्या या वक्तव्याचे कसे पडसाद उमटणार हे पाहणं महत्त्वाचं असणार आहे.



### काय म्हणाले आहेत देवेंद्र फडणवीस?

**»"ज्यांनी सर्वोच्च न्यायालयाची सुनावणी पाहिली आहे त्यांच्या हे लक्षात आलं असेल की उद्धव ठाकरे हे बहुमत चाचणीला सामोरे गेले नाहीत. त्यांचं सरकार परत येऊ शकणार नाही. मी वकील आहे. मी हे सांगू शकतो की उद्धव ठाकरेंनी राजीनामा दिल्यानंतर सर्वोच्च न्यायालय हे त्यांना परत आणून बसवणार नाही. सर्वोच्च न्यायालयाच्या निकालाबाबत अंदाज बांधणं योग्य राहणार नाही. जी आमची भूमिका आहे त्यामुळे आम्हाला असं वाटतं की निकाल योग्य पद्धतीने लागेल.**

## मविआच्या सभेआधी हालचालींना वेग!

### » राष्ट्रवादीचे नेते माजी मंत्री अनिल देशमुख मुंबईला रवाना

। मुंबई ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

महाविकास आघाडीच्या नागपूरमधील सभेआधी हालचालींना वेग आला आहे. राष्ट्रवादीचा बडा नेता मुंबईला रवाना झाल्याची माहीती आहे.

नागपुरात मविआची सभा पार पडणार आहे. मात्र या सभेपूर्वी हालचालींना मोठा वेग आला आहे. मविआच्या सभेपूर्वीच राष्ट्रवादीचे नेते माजी मंत्री अनिल देशमुख मुंबईला रवाना झाले आहेत. नागपुरमध्ये होणाऱ्या वज्रमूठ सभेच्या स्थळाची पाहणी आज अनिल देशमुख हे राष्ट्रवादीच्या कार्यकर्त्यांसोबत करणार होते. मात्र पहाणी रद्द करून अनिल देशमुख मुंबईला रवाना झाले आहेत.

अनिल देशमुख मुंबईला का गेले याचं कारण अस्पष्ट आहे, मात्र महत्त्वाच्या कामासाठी मुंबईला गेले असल्याचं सांगण्यात येत आहे. यामुळे आता मविआमध्ये समन्वयाचा अभाव आहे का? असा प्रश्न पुन्हा एकदा चर्चेला आला आहे.दरम्यान नागपुरामध्ये होणारी महाविकास आघाडीची सभा विविध कारणांमुळे चर्चेत आली आहे. पूर्वी या सभेला भाजपने विरोध केला होता. भाजपकडून सुरू असलेल्या विरोधामुळे ही सभा चर्चेत आली होती. आता पुन्हा एकदा ही सभा चर्चेत आली आहे. सभेपूर्वी मविआचे नेते सुनील केदार, विनायक राऊत यांनी या



## वैद्यनाथ कारखाना आर्थिक अडचणीतः पंकजा मुंडे

**मुंबई :** भाजपच्या राष्ट्रीय सचिव पंकजा मुंडे यांच्या वैद्यनाथ सहकारी साखर कारखान्यावर GST विभागाचा छापा पडला आहे. आज सकाळी १० वाजता GST चे अधिकारी पंकजा मुंडे यांच्या परळी येथील वैद्यनाथ सहकारी साखर कारखान्यात पोहोचले. वैद्यनाथ सहकारी साखर कारखान्यातील आर्थिक व्यवहारांची अधिकाऱ्यांनी कसून चौकशी केलीय.या कारवाईनंतर माध्यमांशी



बोलतांना पंकजा मुंडे म्हणाल्या की, वैद्यनाथ कारखाना मागील अनेक दिवसांपासून बंद असून त्याला कुलूप लावलेलं आहे. कारखाना अत्यंत आर्थिक अडचणीत आहे. २०११ पासून कारखान्यातील सातत्याने झालेलं कमी उत्पादन, २०१३-१५ अशा तीन वर्षातील प्रचंड दुष्काळ, उसाचा अभाव आणि अधिकचं कर्ज या कारणांमुळे कारखाना अडचणीत असल्याचं पंकजा मुंडे यांनी सांगितलं.

पंकजा मुंडे यांच्या परळीतील वैद्यनाथ कारखान्याने १२ कोटींचा जीएसटी चुकवल्याप्रकरणी ही कारवाई करण्यात आल्याची प्राथमिक माहिती आहे. त्यामुळे कारखान्याची मालमत्ता जप्त होऊ शकते. पंकजा मुंडे आणि देवेंद्र फडणवीस यांच्यातील सुप्त कलह लपलेला नाही. काही दिवसांपूर्वी नाशिक येथे स्व. गोपीनाथराव मुंडे यांचा पुतळा अनावरण कार्यक्रमाला फडणवीसांना निमंत्रण नव्हतं. त्यामुळे वैद्यनाथ कारखान्यावर झालेल्या कारवाईविषयी तर्क-वितर्क लढवले जात आहेत.

# असद अहमदचा एन्काऊंटर!

## गँगस्टर अतीक अहमदचा मुलगा ठार, उमेश पाल हत्याकांडानंतर 49 दिवसांनी एसटीएफला यश

। कर्नाटक महाईन्यूज ।

**उमेश पाल हत्याकांड प्रकरणातील फरार असलेला गँगस्टर अतीकचा मुलगा असद आणि शूटर गुलाम मोहम्मदला उत्तर प्रदेश पोलिसांनी ठार केलं आहे. झाशीतल्या बडागाव येथील परीछा डॅमजवळ एसटीएफने असद आणि गुलामचा एन्काउंटर केला. दोघांवरही प्रत्येकी पाच-पाच लाख रुपयांचं बक्षीस जाहीर करण्यात आलं होतं. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार या दोघांकडे परदेशी शस्त्रं सापडली आहेत.**



या दोघांनी २४ फेब्रुवारी रोजी उमेश पाल यांची हत्या केली आणि दोघेही फरार झाले. एसटीएफचं विशेष पथक सातत्याने या दोन आरोपींचा शोध घेत होतं. ते दोघे झाशी येथे असल्याची माहिती मिळाल्यानंतर पोलिसांनी त्यांना ठार केलं. एसटीएफचे उपमहानिरीक्षक (डीआयजी) अनंत देव तिवारी म्हणाले, 'आमच्या पथकाने असद आणि मकसूदला ठार केलं आहे. त्यांच्याकडून पिस्तूल, रिव्हॉल्व्हर आणि परदेशी शस्त्रं जप्त करण्यात आली आहेत.

उमेश पाल यांची आई म्हणाली, माझ्या मुलाला सर्वांसमोर यांनी गोळी मारली होती. आजच्या कारवाईनंतर आम्हाला समाधान मिळालं. माझ्या मुलाचे खुनी मारले गेले. हे जे दोन एन्काउंटर झाले त्याद्वारे त्या दोघांना त्यांच्या पापाची शिक्षा मिळाली. योगीजींचे (उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री) आभार.

कुप्रसिद्ध गँगस्टर अतिकचा मुलगा असद आणि शूटर गुलाम मोहम्मद यांचे एन्काऊंट झाल्याचे वृत्त समोर येताच अनेक प्रतिक्रिया समोर येऊ लागल्या आहेत. एआयएमआयएमचे खासदार असदुद्दीन ओवैसी यांनी या एन्काऊंटप्रकरणी तीव्र संताप व्यक्त करून योगी सरकारला धारेवर धरलं आहे. एएनआय या वृत्तसंस्थेने त्यांचा व्हिडीओ प्रसिद्ध केला आहे.

**गँगस्टर अतीक अहमदचा मुलगा एन्काउंटरमध्ये ठार**

असद आणि शूटर गुलाम मोहम्मद दोघांनी २४ फेब्रुवारी रोजी उमेश पाल यांची हत्या केली आणि दोघेही फरार झाले होते. एसटीएफचं विशेष पथक सातत्याने या दोन आरोपींचा शोध घेत होतं. ते दोघे झाशी येथे असल्याची माहिती मिळाल्यानंतर पोलिसांनी त्यांना ठार केलं. एसटीएफचे उपमहानिरीक्षक (डीआयजी) अनंत देव तिवारी म्हणाले, 'आमच्या पथकाने असद आणि मकसूदला ठार केलं आहे. त्यांच्याकडून पिस्तूल, रिव्हॉल्व्हर आणि परदेशी शस्त्रं जप्त करण्यात आली आहेत.'

### योगी सरकारवर डागलं टीकास्त्र

» गँगस्टर अतिकचा मुलगा असद आणि शूटर गुलाम मोहम्मद या दोघांचेही उत्तर प्रदेशच्या पोलिसांनी एन्काउंटर केले आहे. यावरून देशपातळीवर उत्तर प्रदेश पोलिसांचं कौतुक केलं जातंय. मात्र, एआयएमआयएमचे खासदार असदुद्दीन ओवैसी यांनी याप्रकरणी योगी सरकावर टीकास्त्र सोडलं आहे. धर्माच्या नावाखाली येथे एन्काउंटर केलं जातं, असा घणाघात त्यांनी केला. ते तेलंगणाच्या निझामाबाद येथे बोलत होते.

### काय म्हणाले ओवैसी?



» "जुनैद आणि नसिरला ज्यांनी मारलं त्यांचं भाजपा एन्काऊंटर करणार आहे का? ते नक्कीच एन्काऊंटर करणार नाहीत. कारण तुम्ही धर्माच्या नावाखाली एन्काऊंटर करता", असं ओवैसी म्हणाले. "जुनैद आणि नसीर यांच्या हत्येतील एकच आरोपी पकडला गेला, इतर नऊ आरोपी अद्यापही गायब आहेत. त्यांचं एन्काऊंटर करणार का? नाही करणार. कायदा पायदळी तुडवला जातोय. तुम्हाला संविधानाचाच एन्काऊंटर करायचा आहे. कायदा आणि सुव्यवस्थेला तुम्हाला कमजोर करायचं आहे. मग न्यायालय कशासाठी आहेत? न्यायाधीश कशासाठी आहेत? गोळ्या घालूनच न्याय द्यायचं ठरवलं असेल तर न्यायालये बंद करा. न्यायाधीश काय काम करणार. हे काम कोर्टाचं आहे. तुमचं नाही. तुम्ही आरोपींना पकडा. कोणी हत्या करत असेल तर शिक्षा द्या त्यांना. बारा, चौदा वर्षे शिक्षा द्या", असं म्हणत ओवैसी यांनी

---

# "भाजपा नेत्यांच्या मुलींनी केलं तर ते 'लव्ह', इतरांनी केलं तर 'जिहाद"

## लव्ह जिहादवरून काँग्रेसच्या मुख्यमंत्र्यांची आगपाखड

। नवी दिल्ली ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

**लव्ह जिहादवरून काँग्रेसचे नेते आणि छत्तीसगडचे मुख्यमंत्री भुपेश बघेल यांनी भाजपाला लक्ष्य केलं आहे. धर्माच्या नावाखाली राजकीय पोळी शेकण्याचा प्रयत्न होत असल्याचंही बघेल म्हणाले. देशात लव्ह जिहादविरोधी कायदा व्हावा याकरता केंद्र सरकारकडून प्रयत्न सुरू आहेत. तर, दुसरीकडे छत्तीसगडचे मुख्यमंत्री आणि काँग्रेसचे नेते भुपेश बघेल यांनी यावरूनच भाजपावर टीकास्त्र सोडलं आहे. 'भाजपा नेत्यांच्या मुलींनी मुस्लिम समाजातील मुलासोबत लग्न केलं तर ते प्रेम असतं आणि इतर मुली मुस्लिम मुलाशी लग्न करतात तेव्हा तो जिहाद ठरतो', असं म्हणत भुपेश बघेल यांनी भाजपाला लक्ष्य केलं. छत्तीसगडच्या बेमेतारा जिल्ह्यातील बिरानपूर गावात ते पत्रकारांशी बोलत होते.**



'ते लव्ह जिहादविषयी बोलतात. पण भाजपाच्या वरिष्ठ नेत्यांच्या मुलींनीच मुस्लिम समाजातील मुलाशी लग्न केलं आहे. मग हा लव्ह जिहाद ठरत नाही का? छत्तीसगडमधील भाजपाच्या मोठ्या नेत्याची मुलगी सध्या कुठे आहे विचारा? हा लव्ह जिहाद नाहीये का? जेव्हा त्यांची मुलगी असं करते तेव्हा ते प्रेम आणि इतर कोणी असं करत असेल तेव्हा तो जिहाद ठरतो', अशी टीका त्यांनी यावेळी केली.

"हे सर्व थांबवण्यासाठी भाजपाने आतापर्यंत काय केलं आहे? या सर्व प्रकरणातून ते फक्त राजकीय फायदा घेत आहेत. ते त्यांच्या जावयाला मंत्री, खासदार बनवतात आणि इतरांना वेगळा न्याय लावतात", असंही बघेल म्हणाले.

### भुपेश बघेल असं का म्हणाले?

» छत्तीसगडच्या बेमतेरा शहरापासून ६० किमी अंतरावर असलेल्या बिनारपूर गावात आठ एप्रिल रोजी शाळेतील मुलांमध्ये वाद झाला. या वादाचं रुपांतर धार्मिक हिंसाचारात झालं. यामुळे भुनेश्वर साहू या २२ वर्षीय तरुणाचा यात मृत्यू झाला. तर, तीन पोलीस जखमी झाले होते. यावरून हिंदू संघटनांनी निषेध व्यक्त केला होता. या प्रकरणाला भाजपाकडून जाणीवपूर्वक जातीय रंग दिला जातोय, असा दावा भुपेश बघेल यांनी केला आहे. "या प्रकरणाच्या चौकशीसाठी भाजपाने कोणतीही कमिटी स्थापन केली नाही. भाजपाचे सर्व खासदार गर्दीच्या मागे धावत आहेत. मृत मुलाच्या कुटुंबीयांप्रती दुःख व्यक्त करण्यापेक्षा ते हे प्रकरण अधिक भडकवत आहेत", असंही भुपेश बघेल म्हणाले.

# जब जिंदगी झंड होती है, तो पुना, बंबईही याद आती है...! 'टीडीएम'चा धमाकेदार ट्रेलर रिलीज

पुणे: मराठी सिनेसृष्टीत नेहमीच वेगवेगळे प्रयोग होताना दिसतात. गेल्या काही वर्षांपासून गावातील संस्कृती, गावचा रांगडेपणा, स्थानिक-सामाजिक प्रश्नांवर बोलणारे चित्रपट आपल्याला पाहायला मिळत आहेत. आधुनिकीकरणाच्या युगात गावाकडचे गावपण जपणारे चित्रपट आणणारा प्रसिद्ध दिग्दर्शक भाऊराव कऱ्हाडे पुन्हा एकदा अशाच एका चित्रपटासह आपल्या सर्वांच्या भेटीला येणार आहे. २८ एप्रिल रोजी भाऊचा 'टीडीएम' हा सिनेमा प्रेक्षकांचे मनोरंजन करायला सज्ज होतोय.


तत्पूर्वी बुधवार (१२ एप्रिल) रोजी टीडीएमचा ट्रेलर प्रदर्शित झाला असून अवघ्या काही तासांतच ट्रेलरला हजारोंमध्ये व्ह्यूज आले आहेत. नवोदित कलाकार पृथ्वीराज थोरात आणि कालिंदी निस्ताने यांच्या टीडीएममधील गाण्यांनीच सिनेरसिकांना वेड लावले होते. मन झालं मल्हारी, एक फुल वाहतो सखे ही गाणी लोकांच्या मुखात होती. त्यामुळे टीडीएमच्या ट्रेलरची प्रेक्षक चातकाप्रमाणे वाट पाहात होते. अखेर बुधवारी या सिनेमाचा ट्रेलर रिलीज झाला आहे.

पुण्यातील सिटी प्राईड कोथरूड येथे टीडीएमचा ट्रेलर लॉंच सोहळा पार पडला. यावेळी मातीतला माणूस भाऊराव यांनी बॅंड-बाजाच्या धूमधडाक्यात ट्रॅक्टरमधून संपूर्ण टीडीएम टीमची सिटी प्राईडसमोरुन मिरवणूक काढली. चित्रपटात मुख्य भूमिकेत असलेला पृथ्वीराज हातात केशरी झेंडा घेऊन ट्रॅक्टरमध्ये उभा होता. त्याच्यासह दिग्दर्शक भाऊराव आणि टीडीएमची संपूर्ण टीम उपस्थित होती. विशेष म्हणजे, अभिनेत्री कालिंदीने ट्रॅक्टर चालवत कोथरुडकरांना सैराटमधील आर्चीची आठवण करुन दिली. धमाकेदार एंट्रीनंतर मोठ्या पडद्यावर बहुप्रतिक्षित ट्रेलर दाखवण्यात आला.

ट्रेलरवरुन लक्षात येते की, टीडीएम सिनेमात अभिनेता पृथ्वीराज विहीर खोदणाऱ्या आणि वाळू विक्री करणाऱ्या कुटुंबातील मुलगा आहे. वाळूचा मोठा व्यवसाय करत श्रीमंत बनण्याचे त्याचे स्वप्न असते. परंतु जिथे नायक आला तिथे खलनायकही आलेच... त्याचप्रमाणे गावातील काही लोक त्याच्या स्वप्नपूर्तीत आडकाठी करताना दिसतात. ट्रेलरमध्ये पृथ्वीराज आणि कालिंदीमध्ये हळूवार फुलत जाणाऱ्या प्रेमाचे काही क्षणही दाखवण्यात आले आहेत. तसेच रोमान्स आणि ड्रामाबरोबर प्रेक्षकांना खुर्चीत खिळवून ठेवणारे ॲक्शन सीनही आहेत. HTTPS://YOUTU.BE/ERKTMCGDB6M ट्रेलरमधील काही डायलॉग्सनी देखील प्रेक्षकांचे लक्ष वेधले आहे. 'जब जिंदगी झंड होती है, तो पुना, बंबईही याद आती है'.... पृथ्वीराजच्या या डायलॉगला प्रेक्षकांकडून टाळ्या, शिट्ट्यांनी दाद मिळाली. त्यामुळे सिनेमा रिलीज झाल्यानंतर हा डायलॉग नक्कीच



# सारा पडद्यावर विकी कौशलसोबत दिसणार रोमान्स करताना, चित्रपटाच्या शीर्षकाची झाली घोषणा



विकी कौशल आणि सारा अली खान पहिल्यांदाच ऑनस्क्रीन रोमान्स करताना दिसणार आहेत. त्याच्या चित्रपटाचे शीर्षकही अखेर समोर आले आहे. बुधवारी जिओ स्टुडिओने त्यांच्या आगामी चित्रपट आणि वेब सीरिजची घोषणा केली. दरम्यान, विकी आणि साराच्या आगामी चित्रपटाच्या शीर्षकाची घोषणा करण्यात आली. स्टुडिओने त्याच्या आगामी प्रोजेक्ट्सची झलकही शेअर केली.

विकी कौशल आणि सारा अली खानच्या आगामी चित्रपटाचे नाव 'जरा हटके जरा बच के' आहे. याचे दिग्दर्शन लक्ष्मण उतेकर यांनी केले असून हा एक रोमॅंटिक कॉमेडी असल्याचे सांगण्यात येत आहे. नुकतेच या चित्रपटाच्या सेटवरील काही फोटो सोशल मीडियावर समोर आले आहेत. फोटोंमध्ये, सारा सुंदर निळ्या आणि लाल रंगाची साडी नेसलेली आणि मंगळसूत्र आणि बांगड्या घातलेली दिसली. तर विकी कॅज्युअल पोशाखात बाईक चालवताना दिसला.

शूटिंग संपल्यानंतर साराने एक इमोशनल नोटही लिहिली. ज्यामध्ये तिने आपल्या टीमबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. साराने लिहिले, "विश्वासच बसत नाही की हे आधीच संपले आहे. लक्ष्मण उतेकर सर, मला सौम्या दिल्याबद्दल धन्यवाद. मार्गदर्शन, संयम आणि पाठिंब्याबद्दल धन्यवाद. नेहमी इतके समजून घेतले आणि नेहमीच मला चांगले बनवले." मला प्रेरणा दिल्याबद्दल धन्यवाद. "

# रोनित रॉयच्या मुलाची सोशल मीडियावर हवा...

आपल्या दमदार अभिनयासाठी बॉलीवूडमध्ये ओळखला जाणारा अभिनेता रोनित रॉय सध्या त्याच्या 'गुमराह' या सिनेमामुळे चर्चेत आहे. सिनेमाच्या स्पेशल स्क्रिनिंगला तो आपल्या कुटुंबासोबत उपस्थित राहिला होता तेव्हा सगळी लॅमलाइट खेचून घेऊन गेला तो त्याचा मुलगा अगस्त्य.

या खास क्षणी रोनितची बायको निलम देखील त्यांच्यासोबत उपस्थित होती. यादरम्यान रोनितचा मुलगा अगस्त्यनं आपल्या साधेपणानं सगळ्यांचे मन जिंकले असल्याचं बोललं



जात आहे. मीडियाला तरी अगसत्य भलताच आवडला आहे. अगस्त्यची उंची खूपच छान आहे आणि या स्क्रीनिंगला तो ज्या पेहरावात आलाय त्यात खूपच स्मार्ट दिसत आहे. रोनितच्या मुलाला सोशल मीडियावर काही नेटकऱ्यांनी विचित्र कमेंट्सही दिल्या आहेत.ज्यावर रोनित रॉयनं स्पष्टिकरणही दिलं होतं. काही नेटकऱ्यांना उत्तर देत रोनितनं लिहिलं की,'त्याचा मुलगा ॲबनॉर्मल किंवा स्पेशल नाहीय..पण उंचीला थोडा जास्त आणि लाजाळू आहे. काही कमेंट्स आपण वाचल्या ज्यांना प्रत्युत्तर देणं गरजेचं वाटलं', असं देखील रोनित रॉय म्हणाला. 'अगस्त्यची उंची १५ व्या वर्षी ६ फूट,६ इंच झाली होती त्यामुळे आपल्या या उंचीसोबत नेहमी तो ॲडजस्ट करण्याचा प्रयत्न करताना दिसतो'.

# रोमान्स, ड्रामा आणि ॲक्शनचा थरार असलेला 'लॉ ऑफ लव्ह'

पुणे: आजवर प्रेम म्हणजे काय? याचा अर्थ सांगणारे अनेक मराठी सिनेमे आपण पाहिले आहेत. परंतु प्रेमाचा एक कायदाही असतो, असे सांगणारा चित्रपट आजवर कधी निर्माण झालेला नाही. मात्र नवोदित मराठी चित्रपट दिग्दर्शक व अभिनेता जे उदय हे प्रेमाचा कायदा हा अनोखा आणि हटके विषय मांडणारा सिनेमा प्रेक्षकांसाठी घेऊन आले आहेत. 'लॉ ऑफ लव्ह' असे या सिनेमाचे नाव आहे. या सिनेमात प्रेक्षकांना प्रेम, प्रेमातला वेडेपणा, ड्रामा आणि ॲक्शनचा थरार पाहायला मिळेल.

'लॉ ऑफ लव्ह' हा मराठी चित्रपट ११ मे २०२३ रोजी पॅन इंडिया लेव्हलवर हिंदी भाषेतून प्रदर्शित होणार आहे. 'लॉ ऑफ लव्ह' म्हणजे प्रेमाचा कायदा. प्रेमाचा एक कायदा आहे. तो काय आहे? व त्याचा चांगला आणि वाईट परिणाम तरुण पिढीवर काय पडतो? हे जाणून घेण्यासाठी तुम्हाला ११ मे रोजी जवळच्या चित्रपटगृहात जाऊन हा सिनेमा पाहावा लागेल. या सिनेमात फुल्ल टू रोमान्स आणि ॲक्शन अनुभवायला मिळेल.

विशेष म्हणजे, 'केजीएफ' सिनेमातील सुपरस्टार यशला आवाज दिलेला मराठी सुपूत्र सचिन गोळे याच्या जबरदस्त आवाजात 'लॉ ऑफ लव्ह' या चित्रपटाचे हिंदी डबींग झाले आहे. या चित्रपटाद्वारे अभिनेता जे उदय मराठी सिनेसृष्टीत पदार्पण करत आहेत. तसेच या चित्रपटामध्ये शाल्वी शाह, मोहन जोशी, यतीन कार्येकर, अनिल नगरकर, प्राची पालवे आणि योगेश पवार यांच्याही महत्त्वाच्या भूमिका असणार आहेत. चित्रपटाचे दिग्दर्शन, कथा आणि पटकथा ही जे उदय यांची असून तेच या चित्रपटाचे निर्माते देखील आहेत. आणखी एक खास बाब म्हणजे प्रेमाच्या एक वेगळ्या दुनियेत घेऊन जाणारी गाणी या सीमेमात आहेत. वेदिका फिल्म क्रियेशन निर्मीत 'लॉ ऑफ लव्ह' सिनेमाला शंकर पवार यांनी संगीत दिले आहे.



# शुबमनने किंग्सना दाखवले अस्मान!

## » गुजरातचा पंजाबवर सहा गडी राखून दणदणीत विजय

। मुंबई ।
महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

आयपीएलमध्ये आज गुजरात टायटन्सचा सामना पंजाब किंग्जशी मोहालीतील पंजाब क्रिकेट असोसिएशनच्या मैदानावर संपन्न झाला. दोन्ही संघांनी आपला शेवटचा सामना गमावला असून या सामन्यात त्यांना विजयी मार्गावर परतायचे होते. त्यात गुजरात टायटन्सने बाजी मारत यजमानांना त्यांच्याच घरात तब्बल सहा गडी राखून दणदणीत विजय मिळवला. हा सामना जिंकत गुजरातचा संघ गुणतालिकेत पहिल्या चार संघांमध्ये पोहोचला आहे.

गुजरात टायटन्सने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला होता. पंजाब किंग्जने प्रथम फलंदाजी करताना १५३ धावा केल्या होत्या. धावांचा पाठलाग करताना गुजरातची सुरुवात चांगली झाली. सलामीवीर वृद्धिमान साहा आणि शुबमन गिल यांच्यात ४८ धावांची दमदार भागीदारी झाली. साहा १९ चेंडूत ३० धावा करत रबाडाकरवी बाद झाला. त्याने त्याच्या खेळीत ५ चौकार मारले. त्यानंतर आलेला नवोदित साई सुदर्शन फारशी मोठी खेळी करता आली नाही तो १९धावा करून बाद झाला.मागील सामन्यात बाहेर असलेला कर्णधार हार्दिक पांड्या केवळ ८ धावा करून नवख्या हरप्रीत ब्रारकडून बाद झाला. मात्र, एका बाजूला शुबमन गिल जो पंजाबचा होम ग्राउंडवर लहानपणापासून खेळणारा




फलंदाजाने पंजाब किंग्सला शानदार अर्धशतक झळकावत अस्मान दाखवले. त्याने ४९ चेंडूत ६७ धावा केल्या. त्याला सॅम करणने त्रिफळाचीत केले. डेव्हिड मिलरने १८ चेंडूत १७ धावा करत सामना जिंकवून दिला. पंजाब किंग्सच्या गोलंदाजांना फारशी चमकदार कामगिरी करता आली नाही. तेवतियाने चौकार मारून सामना जिंकावला. अर्शदीप सिंग, कगिसो रबाडा, सॅम करण आणि हरप्रीत ब्रार यांनी प्रत्येकी एक-एक विकेट घेतली. हा सामना गमावल्याने संघाची ओनर प्रीती झिंटा मात्र नाराज झाली.

तत्पूर्वी, प्रथम फलंदाजी करताना पंजाब किंग्जने २० षटकांत ८ गडी गमावून १५३ धावा केल्या होत्या. पंजाबच्या पाच फलंदाजांनी २० पेक्षा जास्त धावा केल्या. मात्र असे असतानाही संघ केवळ १५३ पर्यंतच पोहोचू शकला. पंजाबकडून मॅथ्यू शॉर्टने सर्वाधिक ३६ धावा केल्या. गुजरात टायटन्सकडून पदार्पण करणाऱ्या मोहित शर्माने दोन बळी घेतले, तर चार गोलंदाजांनी प्रत्येकी एक बळी घेतला. प्रथम फलंदाजीसाठी उतरलेल्या पंजाब किंग्ज संघाची सुरुवात चांगली झाली नाही. पहिल्याच षटकात प्रभासिमरन पॅव्हेलियनमध्ये परतला. यानंतर शिखर धवनही स्वस्तात बाद झाला. त्याने ८ धावा केल्या. मॅथ्यू शॉर्टने वेगवान खेळी खेळली. पण २४ चेंडूत ३६ धावा करून क्लीन बोल्ड झाला.

---

# अबब...२०० कोटींचा आकडा पार!

## » प्लॅटफॉर्मवर प्रेक्षकांचा रिकॉर्डब्रेक प्रतिसाद

। नवी दिल्ली ।
महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

एमएस धोनी हे क्रिकेट जगतातील एक मोठे नाव असून त्याच्या चाहत्यांच्या मनात त्याचे विशेष स्थान आहे. आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्ती घेतलेला धोनी आजही चाहत्यांच्या मनावर राज्य करतो. मैदान कोणतेही असो, धोनीवर चाहत्यांचे प्रेम विशेष आहे. चेन्नई सुपर किंग्जचा कर्णधार एमएस धोनी राजस्थान रॉयल्सविरुद्ध धावांचा पाठलाग करताना षटकार मारत होता, तेव्हा जिओ-सिनेमावरील दर्शकांची संख्या २२ दशलक्ष ओलांडली होती. सध्याच्या २०२३ सीझनमध्ये JIO-CINEMA या स्पर्धेच्या ऑनलाइन लाईव्ह स्ट्रीमिंग प्लॅटफॉर्मवर आतापर्यंतची सर्वाधिक प्रेक्षकसंख्या पाहिली



गेली.

### विक्रमी प्रेक्षकांनी सामना पाहिला

**» शेवटच्या चेंडूपर्यंत प्रेक्षक श्वास रोखून सामन्यातील चढ-उतार पाहत राहिले. महेंद्रसिंग धोनीने पुन्हा एकदा जुन्या दिवसांची झलक दाखवली. सर्वोत्तम फिनिशर समजल्या जाणाऱ्या धोनीने शेवटच्या षटकात सलग दोन षटकार मारून सामना रोमांचक केला. मात्र, राजस्थान रॉयल्सचा वेगवान गोलंदाज संदीप शर्माने शेवटच्या चेंडूवर केवळ एक धाव घेतली आणि चेन्नई सुपर किंग्जचा तीन धावांनी पराभव झाला. धोनीने १८८ च्या स्ट्राईक रेटने धावा केल्या. आयपीएलचा हा रंजक सामना बुधवारी चेन्नईच्या चेपॉक स्टेडियमवर खेळला गेला.**

धोनीची लाईव्ह बॅटिंग पाहण्यासाठी रेकॉर्डब्रेक प्रेक्षक ऑनलाइन होते. राजस्थान आणि चेन्नई यांच्यातील सामन्यात धोनी फलंदाजी करत होता तेव्हा लाईव्ह स्ट्रीमिंग पाहणाऱ्यांची विक्रमी लक्षांपर्यंत पोहोचली होती. आयपीएल २०२३च्या दर्शकांची ही सर्वाधिक संख्या आहे. आयपीएलमध्ये काल रात्री राजस्थान रॉयल्स आणि चेन्नई सुपर किंग्ज आमनेसामने होते. या सामन्यात, ऑनलाइन स्ट्रीमिंग पाहणाऱ्यांची संख्या जवळपास संपूर्ण काळ एक कोटीच्या वर होती. जसजसा सामना शेवटच्या षटकांकडे जात होता, तसतशी प्रेक्षकांची संख्याही वाढत होती. धोनी खेळपट्टीवर फलंदाजीला आल्यानंतर त्यात आणखी वाढ झाली. २.२ कोटींहून अधिक क्रिकेट चाहते एकाच वेळी हा सामना पाहत होते.

टाटा आयपीएल २०२३चे डिजिटल स्ट्रीमिंग पार्टनर जिओ सिनेमाने मागील आठवड्याच्या शेवटी दर्शकसंख्येच्या बाबतीत चांगली सुरुवात केली. पहिल्या आठवड्याच्या शेवटी व्हिडिओ दृश्यांच्या संख्येने मागील संपूर्ण हंगामातील व्हिडिओ दृश्यांच्या संख्येला मागे टाकले. जिओ-सिनेमावरील व्हिडिओ रेकॉर्ड १४७ कोटींहून अधिक व्ह्यूज पाहिले. जिओ-सिनेमावर प्रति व्हिडीओ प्रति मॅच खर्च करण्यात येणारा वेळ देखील ६०% ने वाढला आहे.

---

## रविंद्र जडेजाने टी-२० क्रिकेटमध्ये रचला इतिहास 'असा'

## विक्रम करणारा भारताचा पहिला डावखुरा गोलंदाज

। चेन्नई । महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

बुधवारी झालेल्या अटीतटीच्या सामन्यात राजस्थान रॉयल्सने चेन्नई सुपर किंग्जचा ३ धावांनी पराभव केला. परंतु, दुसरीकडे सीएसकेचा स्टार अष्टपैलू खेळाडू रविंद्र जडेजाने मोठ्या विक्रमाला गवसणी घातली आहे. धोनीने आयपीएलमध्ये एकाच संघासाठी २०० सामन्यात नेतृत्व करण्याचा विक्रम केला आहे. तर जडेजाने त्याच्या टी-२० करिअरमध्ये २०० विकेट्स पूर्ण केल्या आहेत. सामन्यात सॅमसनला बाद केल्यानंतर जडेजाने टी-२० करिअरमध्ये २०० विकेट पूर्ण केल्या आहेत. जडेजा भारताकडून टी-२० मध्ये २०० किंवा त्याहून अधिक जास्त विकेट घेणारा नववा गोलंदाज बनला आहे. याशिवाय जडेजा भारताचा असा डावखुरा गोलंदाज आहे, ज्याने टी-२० क्रिकेटमध्ये २०० विकेट घेण्याची कमाल केली आहे. तसंच, जयदेव उनादकटने टी-२० मध्ये आतापर्यंत २१० विकेट्स घेण्याची चमकदार



### टी-20 क्रिकेटमध्ये 200 विकेट्स घेणारे भारतीय गोलंदाज

- »युजवेंद्र चहल- ३०७ विकेट
- आर अश्विन – २९१ विकेट
- पीयूष चावला – २८० विकेट
- अमित मिश्रा – २७५ विकेट
- भुवनेश्वर कुमार – २५८ विकेट
- जसप्रीत बुमराह – २५६ विकेट
- हरभजन सिंह – २३५ विकेट
- जयदेव उनादकट – २१० विकेट
- रवींद्र जडेजा – २०० विकेट

कामगिरी केली आहे पण तो वेगवान गोलंदाजांच्या श्रेणीत आहे. याशिवाय सीएसकेकडून आयपीएलमध्ये खेळताना जडेजाने १२० विकेट्स पूर्ण केल्या आहेत.